**प्रेस नोट** दिनांक ०९/०३/२०१९

दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे

# महिला दीना निमित्त जनता वसाहत मध्ये कायदेशीर मार्गदर्शन

ज्या महिला भगिनींना काही अनुचित प्रकार स्वतः बाबतीत किंवा आसपासघडलेला दिसत असल्यास त्यांनी मोठ्या भावा प्रमाणे पोलिसांना त्याची माहितीद्यावी.जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने जनता वसाहत परिसरात गरीब कुटुंबातील महिला आणि मुलींना येणाऱ्या अडी अडचणी सोडविण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधून पोलीस दल सदैव महिलांच्या पाठीशीखंबीर पणे उभे आहे याचा"भरोसा" देण्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.दत्तवाडी पोलीस स्टेशन चे सहायक पोलिस निरीक्षक नंदकुमार केचे ,पोलीस उपनिरीक्षक राजू पवार ,पोलीस नाईक साधना केचे,महिला दक्षता समिती सदस्य धनश्री पुराणिक,सुप्रिया साठे,एड्स इनऍक्शन या सामाजिक संस्थेच्या प्रोजेक्ट को ओरडीनेर शारदा शिंदे,यांच्याप्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.या वेळेस जनता वसाहत परिसरातील महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

जनता वसाहत पोलीस चौकीचे सहायक पोलिस निरीक्षक नंदकुमार केचे यांनी महिलांना केलेल्या मार्गदर्शनात सांगितले की , झोपडपट्टी परिसरात शिक्षणाचा अभाव असल्याने गुंड प्रवृत्तीचे लोक महिलांचा गैरफायदा घेतात.आपल्या आजूबाजूला एखादी अप्रिय घटना घडत असल्यास महिलांनी निसंकोचन पणे आपल्या जवळच्या पोलीस चौकीत जाऊन त्याची माहिती पोलिसांना दिल्यास पोलीस तुम्हाला मदत करतील याची खात्री बाळगावी.

ज्या महिलांकडे मोबाईल फोन आहे त्यांनी पोलीस विभागाने सुरू केलेल्या"सतर्क"अँप डाऊन लोडकरून घ्यावे व आजूबाजूला अप्रिय घटना घडल्यास त्याचा फोटो काढून अँप द्वारेपुढे पाठवून द्यावे.म्हणजे स्थानिक पोलीस त्या अप्रिय घटनेची वेळीच दखल घेतील.

